# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.11.2025** **वारःरविवार**

---

1) संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत असून त्या पार्श्वभूमीवर आज सर्वपक्षीय बैठक होणार

2) पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार

3) बदलत्या तंत्रज्ञानानुसार आत्मनिर्भर होण्यासाठी सैन्य दलात दाखल होणाऱ्या छात्रांनी सक्षम राहावं -- केंद्रीय लोकसेवा आयोगाचे प्रमुख डॉक्टर अजय कुमार यांच आवाहन

4) श्रीलंकेत चक्रीवादळ दितवाहने मोठ्या प्रमाणात नुकसान आतापर्यंत १५९ जणांचा मृत्यू, हे चक्रीवादळ उत्तर तामिळनाडू सरकल्यामुळे पूर्व भारताच्या किनारपट्टीवर पावसाचा आणि सतर्कतेचा इशारा आणि

5) भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या पन्नास षटकांच्या तीन सामन्यांच्या क्रिकेट मालिकेला

**<u>संसद अधिवेशन</u>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत असून त्या पार्श्वभूमीवर सरकारनं आज सर्वपक्षीय बैठक बोलवली आहे .यावेळी संसदीय कामकाज मंत्री किरेन रीजिजू लोकसभा आणि राज्यसभेतल्या सर्व पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करणार आहेत. या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सरकार सर्व पक्षाच्या सदस्यांना विनंती करेल, असं रिजीजू यांनी सांगितलं. हे अधिवेशन १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.या काळात विविध महत्वपूर्ण विधेयकांवर चर्चा होण्याची आणि ती मंजूर होण्याची शक्यता असून त्यामध्ये अणु विधेयक 2025 , विमा विधि संशोधक विधेयक , भारत उच्च शिक्षण आयोग विधेयक आणि राष्ट्रीय महामार्ग विधेयक आदींचा समावेश आहे . या अधिवेशनाच्या 19 दिवसांत संसदेच्या 15 बैठका होण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान

छत्तीसगड मधल्या रायपूर इथ सुरू असलेल्या अखिल भारतीय स्तरावरील पोलिस महासंचालक आणि पोलिस ऊपनिरीक्षकांच्या संमेलनाचा आज समारोप होत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या संमेलनात भारताच्या सुरक्षा व्यवस्थेच्या विविध पैलूंवर व्यापक चर्चा

झाल्याच पंतप्रधानांनी आपल्या समाज मध्यमावरील संदेशात म्हंटल आहे. सुरक्षा क्षेत्रातील उच्चस्तरीय व्यवस्था आणि नव संशोधन यावर विचार करण्यासाठी हे संमेलन महत्वपूर्ण व्यासपीठ ठरल असल्याच मोदी यांनी म्हंटल आहे. या संमेलनाच्या आजच्या समारोप कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते राष्ट्रपती पोलिस पदके ही प्रदान केली जाणार आहेत. विकसित भारताचे नवे सुरक्षा आयाम ही या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना असून गृहमंत्री अमित शहा , राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, गृहराज्यमंत्री आणि विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील पोलिस महासंचालक आणि केंद्रीय पोलिस संस्थांचे प्रमुख या संमेलनात भाग घेत आहेत.

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२८ वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनलवर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**<u>एनडीए</u>**

बदलत्या तंत्रज्ञानानुसार आत्मनिर्भर होण्यासाठी सैन्य दलात दाखल होणाऱ्या छात्रांनी सक्षम राहावं असं आवाहन केंद्रीय लोकसेवा आयोगाचे प्रमुख डॉक्टर अजय कुमार यांनी काल पुण्यात केलं. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीच्या दीक्षांत सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. आगामी शतकातील युद्धांमध्ये शहाणपणा, सहानुभूती आणि बुद्धिमत्तेनं जो नेतृत्व करेल त्याचाच विजय होईल असंही त्यांनी अधोरेखित केलं. या तुकडीचं दीक्षांत संचलन आज सकाळी एनडीए च्या मैदानावर सुरू असून नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित आहेत.
काल या दीक्षांत समारंभात ३२९ स्नातकांना जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये ७२ स्नातकांना विज्ञान, ९२ संगणक विज्ञान, ५४ कला शाखा आणि १११ स्नातकांना बी टेक पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १५ मित्र देशांच्या स्नातकांचा तर १५ महिला स्नातकांचा समावेश आहे. प्रबोधिनीचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी, प्राचार्य डॉक्टर विनय दीप यावेळी उपस्थित होते. विज्ञान शाखेचं रौप्य पदक कार्तिक महेश्वरी, संगणक विज्ञान रौप्य पदक अनन्या बालोनी, कला शाखा रौप्य पदक अनुराग गुप्ता, बी टेक रौप्य पदक पुण्याच्या विश्वेष भालेराव यांना यावेळी प्रदान करण्यात आलं.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्ण आज हरियाणातील कुरुक्षेत्र इथ जाणार असून या भेटी दरम्यान ते राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या 20 व्या दीक्षांत समारंभात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत . तसच उद्याच्या गीता जयंतीच्या पार्श्वभूमीवर कुरुक्षेत्र इथ सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवाअंतर्गत होणाऱ्या अखिल भारतीय देवस्थान संमेलनातही ते सहभागी होणार आहेत .

**<u>थायलंड</u>**

थायलंडचे परराष्ट्रव्यवहारमंत्री सिहासक फुआंग केतकेओ  चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले असून काल रात्री नवी दिल्लीत त्यांच  प्रतिनिधी  मंडळा  समवेत आगमन झाल.  त्यांचा दौरा 2 डिसेंबर पर्यंत असून आज ते दिल्लीत विविध उच्चस्तरीय कार्यक्रमात भाग घेणार आहेत. उद्या हैदराबाद हाऊस इथ ते भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जय शंकर यांच्या बरोबर द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. भारत आणि थायलंड यांच्यात  1947 पासून सौहार्दपूर्ण संबंध असून 2022 मध्ये दोन्ही देशांच्या या संबंधांचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला होता.

**<u>वादळ</u>**

श्रीलंकेत चक्रीवादळ दितवाहने मोठ्या प्रमाणात नुकसान केलं आहे. आपत्ती व्यवस्थापन केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, प्रतिकूल हवामानामुळे आतापर्यंत १५९ जणांचा मृत्यू झाला आहे तर २०३ जण बेपत्ता असल्याची माहिती आहे. या चक्रीवादळामुळे  आलेल्या पूर आणि भूस्खलनामुळे भारताने ऑपरेशन सागर बंधू अंतर्गत श्रीलंकेत मानवतावादी मदत कार्यात मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. काल दोन भारतीय हवाई दलाच्या विमानांनी २१ टन मदत साहित्य आणि ८० एनडीआरएफ जवान पुट्टलम आणि बदुल्ला येथे तैनात केल्यानंतर ४० हून अधिक लोकांचे जीव वाचले आहेत. दोन चेतक हेलिकॉप्टर श्रीलंकेच्या हवाई दलाच्या पथकांमध्ये शोध आणि बचाव मोहिमांमध्ये सामील झाले आहेत, अडकलेल्या रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी आणलं जात आहे.

**<u>वादळ</u>**

दरम्यान दितवा  चक्रीवादळ आता आज सकाळपर्यंत उत्तर तमिळनाडू, पुदुच्चेरी आणि लगतच्या आंध्र प्रदेश किनारपट्टीकडं सरकण्याची शक्यता आहे.

त्यामुळे तामिळनाडू आणि पुदुच्चेरी किनाऱ्यावर सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. पाच किलोमीटर वेगाने हे चक्रीवादळ पुढे सरकत असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे.त्यामुळे किनारी जिल्ह्यांमध्ये मध्यम पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. राज्यातील इतर भागातही हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. तर किनारी आंध्र प्रदेश, यानम आणि रायलसीमा या भागांमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात  विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकार, तटरक्षक दल आणि संबंधित राज्य प्रशासन यांच्यात समन्वय राखण्यात येत आहे. केंद्रीय गृह सचिवांनी तामिळनाडू, पुडुचेरी, आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या मुख्य सचिवांशी बैठक घेऊन सतर्कता बाळगण्याण्याचे निर्देश दिले आहेत.

तटरक्षक दलाने तामिळनाडू किनाऱ्यावर तीन जहाजे आणि एक विमान तैनात केलं असून आपत्कालीन परिस्थितीसाठी एकंदर १४ आपत्ती प्रतिसाद पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. तर पुणे आणि वडोदरा येथून १० अतिरिक्त एनडीआऱएफ पथके चेन्नईकडे रवाना करण्यात आली आहेत.

**पोटनिवडणूक**

नवी दिल्ली महापालिकेच्या 12 प्रभागात आज पोटनिवडणूक होत असून आज सकाळी साडेसात पासून मतदानाला सुरवात झाली आहे. ते संध्याकाळी साडेपाच पर्यंत चालेल . या पोटनिवडणुकीसाठी 26 महिला आणि 25 पुरुष असे 51 उमेदवार निवडणूक रिंगणात असून येत्या 3 डिसेंबर ला मतमोजणी होणार आहे

**करार**

केंद्र सरकारनं ८० कोटी डॉलर्सच्या कर्जासाठी आशियाई विकास बँकेसोबत करार केला आहे. महाराष्ट्रातल्या कृषी सौर पंपांसाठी ५० कोटी डॉलर, इंदूर मेट्रोसाठी १९ कोटी डॉलर आणि गुजरामधल्या कौशल्य विकास कार्यक्रमासाठीच्या ११ कोटी डॉलरच्या कर्जाचा यात समावेश आहे.

**हॉकी**

भारतीय हॉकी संघानं सुलतान अजलनशाह चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. मलेशियात इपोह इथं काल झालेल्या उपान्त्य फेरीच्या सामन्यात भारतानं कॅनडावर १४-३ असा दणदणीत विजय मिळवला. आज होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची लढत बेल्जियमशी होणार आहे.

दरम्यान ,चेन्नईमध्ये सुरू असलेल्या पुरुषांच्या एफ आय एच हॉकी ज्युनियर विश्वचषक स्पर्धा २०२५ मध्ये भारताने काल ओमानवर १७-० असा दणदणीत विजय मिळवला. भारताने दोन सामन्यांत एकंदर २४ गोल करून गट ब मध्ये आघाडी घेतली असून भारतीय संघ उपांत्यपूर्व फेरी गाठण्याची दाट शक्यता आहे. भारताचा पुढील सामना स्वित्झर्लंडविरुद्ध होणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या पन्नास षटकांच्या क्रिकेट मालिकेला आजपासून प्रारंभ होत आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना आज झारखंडमध्ये रांची इथं दुपारी दीड वाजता सुरू होईल. कसोटी मालिकेत झालेल्या निराशाजनक पराभवानंतर आजपासून सुरू होणाऱ्या मालिकेत के एल राहुलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ पुनरागमन करण्यास उत्सुक असेल. तर टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेचा संघ मालिकेत आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल नमस्कार .